मुद्दा आहे
जग बदलण्याचा...



अंमली
दहशतवाद

# कोका, कोकेन आणि हिंसा

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

*अंमली पदार्थांचा अवैध व्यापार हे लॅटिन अमेरिकन देशातील सामाजिक, राजकीय विस्कळितपणाचे प्रमुख कारण.*
*अमेरिकेत वाढत असलेली कोकेनची मागणीच अमेरिकन हस्तक्षेपाला कारण ठरत आहे. अंमली पदार्थांच्या या 'साम्राज्या'चा वेध.*

अंमली पदार्थांचे सेवन हा फक्त व्यसनाधीनांचा प्रश्न नाही. त्याच्याशी गरीबी, साम्राज्यवाद, भांडवलशाही, गुन्हेगारी, हिंसाचार, भूमिपुत्रांचे हक्क, मानवी हक्क आणि प्रचंड पैसा असलेला व्यापार असे अनेक प्रश्न निगडित आहेत. अंमली पदार्थांचे सेवन जगभर, विशेषत: युरोपात आणि लॅटिन अमेरिकेत वाढत आहे. लॅटिन अमेरिकेच्या संदर्भात हा प्रश्न व्यसनाधीन नसलेल्या लक्षावधी लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न झालेला आहे.

१९६१ साली संयुक्त राष्ट्रसंघातर्फे अंमली पदार्थ 'संपूर्ण नियंत्रणा'खाली आणावेत असा आंतरराष्ट्रीय करारनामा झाला. तो १८० देशांनी मान्य केला आहे. म्हणजे जगातील सगळ्याच देशात या पदार्थांचे उत्पादन, वितरण आणि सेवन बेकायदेशीर आहे. त्यामुळे हा व्यवहार जगभर छुपेपणाने चालतो. उत्पादनापासून शेवटच्या ग्राहकापर्यंत म्हणजे व्यसनी माणसापर्यंत अंमली पदार्थ पोचवण्याच्या प्रत्येक टप्प्यामध्ये या पदार्थाची किंमत वाढत जाते. अफूची लागवड अफगाणिस्तानातील शेतात होते आणि त्यापासून बनवलेले हेरॉईन युरोपच्या रस्त्यावर विकले जाते. तोपर्यंत या पदार्थांची किंमत कित्येक पटींनी वाढलेली असते आणि प्रवासही बऱ्याच देशांतून झालेला असतो.

२००० साली जगाने अन्नावर जेवढा खर्च केला, तेवढाच खर्च औषधांवर आणि अंमली पदार्थांवर मिळून केला. त्यात अंमली पदार्थांचा हिस्सा चाळीस हजार कोटी डॉलर्स होता. मोठा फायदा असल्याने संघटित गुन्हेगारी या धंद्याकडे वळते. शेतकऱ्यापासून व्यसनी माणसापर्यंत एक मोठी साखळी या धंद्यात काम करते. सगळाच कारभार बेकायदेशीर असतो, आंतरराष्ट्रीय असतो त्यामुळे गुन्हेगारांबरोबर विविध देशांचे पोलीस, राजकारणी, सरकारी अधिकारी या भ्रष्टाचारात सामील असतात.

अंमली पदार्थांचा प्रश्न सोडवण्याचे तत्त्वत: दोन उपाय संभवतात. एक म्हणजे आपल्या देशातील व्यसनाधीनांवर उपचार करून त्यांना व्यसनमुक्त करणे आणि नवीन मंडळी व्यसनाच्या नादी न लागतील याची तजवीज करणे. दुसरा उपाय म्हणजे अंमली पदार्थांची आयात अगदी बंद करता आली नाही तरी कमीत कमी ठेवणे. त्यांचा पुरवठा आटला की किंमत व्यसनी माणसाला परवडण्याच्या पलीकडे जाईल आणि मग त्याचे या पदार्थाचे

***चन्द्रशेखर पुरन्दरे***
*चित्रकार, लेखक*
*राजकीय-सामाजिक*
*विषयांवरील लेखन व संशोधन.*

सेवन आपोआप कमी होईल हा या मागचा होरा.

अंमली पदार्थांचे उत्पादन करणारे तीन प्रमुख देश आहेत - बोलिव्हिया, कोलंबिया आणि पेरु. वितरण या देशांतील गुन्हेगारी संघटना आणि मेक्सिकोतील गुन्हेगारी संघटना वेगवेगळ्या किंवा संगनमताने करतात. ग्राहक बहुधा अमेरिकेत असतो. पण अलिकडे या पुरवठासाखळीतल्या काही लॅटिन अमेरिकन संघटनांना मोबदला अंमली पदार्थांच्या रूपानेच मिळतो, पैशात मिळत नाही त्यामुळे ग्राहक लॅटिन अमेरिकेतही असू शकतो.

कोका या वनस्पतीपासून काही प्रक्रियेने कोकेन हा अंमली पदार्थ बनतो. कोकेनपासून निरनिराळे अंमली पदार्थही बनतात. पण कोकाची लागवड आणि कोकेनची अमेरिकेतील आयात या भोवती हा संपूर्ण प्रश्न फिरतो.

**अमेरिकेची ढवळाढवळ**

आपल्या देशातील कोकेनच्या व्यसनाचा प्रश्न सोडवण्यासाठी अमेरिकेने आयात कमी करणे हा पर्याय स्वीकारला आहे. अमेरिकेत कोकेन मेक्सिकोच्या सीमेवरून खुष्कीच्या मार्गाने येते, फ्लोरिडा या राज्याच्या किनाऱ्यावर छोट्या तराफ्यांनी किंवा बोटींनी येते आणि हेलिकॉप्टर्स किंवा विमानानेही येते. प्रत्येक ठिकाणची सीमा सुरक्षा दले सतर्क ठेवून किंवा हे स्मगलिंग करणाऱ्यांना अतिशय कडक शिक्षा देऊनसुद्धा हा ओघ थांबलेला नाही. १९६० च्या दशकात अमेरिकेतील व्यसनाचे प्रमाण बरेच वाढले. मग १९७१ साली निक्सन या राष्ट्राध्यक्षाने अंमली पदार्थांविरुद्ध अधिकृतरित्या 'युद्ध' पुकारले. अंमली पदार्थ हा राष्ट्राचा क्रमांक एकचा शत्रू असल्याचे जाहीर केले. तेव्हापासून लॅटिन अमेरिकेतील अमेरिकेची ढवळाढवळ जास्तच वाढली. धोरण असे, की कोकाची लागवडच संपवून टाका. म्हणजे मुळावरच घाव घाला. मग कोकेनही नाही आणि व्यसनाधीनांचा प्रश्नही सुटेल. त्यासाठी लॅटिन अमेरिकेतील बऱ्याच देशांत अमेरिकेने लष्करी तळ उभारले. ज्या राजवटी सोईस्कर नव्हत्या, त्या उलथून टाकल्या आणि आपल्या हातात राहतील अशा लष्करशाह्या सत्तेवर आणल्या. कोकाचे उत्पादक देश सार्वभौम आहेत, त्यांची स्वत:ची संस्कृती आहे, कायदेकानून आहेत याची अमेरिकेला अर्थातच पर्वा नव्हती आणि नाही. एकदा कोकाची लागवड थांबवण्याचा निर्णय घेतल्यावर प्रथम १९८० च्या दशकात बोलिव्हिया आणि पेरुतील कोकाची लागवड कमी करण्याचा प्रयत्न झाला, पण कोकाची लागवड त्या देशातून कोलंबियात सरकली. आता कोलंबिया हा कोका पिकवणारा प्रमुख देश आहे.

**गरीबी व कोकेन**

दुसरा लक्षात घेण्याचा मुद्दा म्हणजे या तीन देशांतील गरीबी आणि वांशिक जडणघडण. बोलिव्हिया हा लॅटिन अमेरिकेतील सगळ्यात गरीब देश. कोलंबियातील बहुसंख्य जनताही दारिद्र्यरेषेखाली आहे. पेरुची परिस्थितीही फार निराळी नाही. त्यात कोलंबियामध्ये अमेरिकेने हस्तक्षेप केल्यापासून म्हणजे अगदी एकोणिसाव्या शतकापासून सामाजिक अशांतता आहे. डावी चळवळ आपल्याकडच्या नक्षलवाद्यांसारखी हिंसक आणि गनिमी काव्याने लढते. त्यांच्याविरुद्ध अशीच हिंसक पण उजवी सशस्त्र दले आहेत आणि अमेरिकेने शस्त्रास्त्रे पुरवलेली व प्रशिक्षण दिलेली कोलंबियाची मिलिटरी आहे. या यादवीमध्ये आणखी एक सहभागी म्हणजे कोकेनचा व्यापार करणाऱ्या गुन्हेगारी संघटना. या सगळ्यांच्यात आपापसात कायम युद्धे चालू असतात. बळी अर्थात सामान्य गरीब जातात. हिंसाचार एवढा आहे, की साडेचार कोटी लोकसंख्या असलेल्या देशात २५ लाख लोक घरदार सोडून ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतरित झाले आहेत. अमेरिकेने पाठिंबा दिलेले देशाचे सैन्य त्यांच्याच लोकांवर अनन्वित अत्याचार करते. आणि डाव्या चळवळीचा पैसा कोकेनमधून येतो असा आरोप करते. कोलंबियाचा पुनर्निवाचित राष्ट्राध्यक्ष अल्वारो उरिबे हा अमेरिकेच्या इशाऱ्याने चालतो. त्याचे एकेकाळचा ड्रगलॉर्ड पाब्ले एस्कोबार याच्याशी घनिष्ट संबंध होते. (एस्कोबारचा ९३ साली खून झाला.)

पेरूमध्येही सतत अशांतता आणि हिंसाचार होत आलेला आहे. 'शायनिंग पाथ' नावाच्या पंथाने १९८०-९० च्या दशकात खूप उद्रेक केले. पेरूमध्ये ४५ टक्के जनता अमेरिइंडियन आहे. तर बोलिव्हियात ७०% जनता आदि-रहिवासी आहे. कोकाचे या लोकांना असणारे महत्त्व हा तिसरा मुद्दा. कोका ही वनस्पती एतद्देशीय जमातींच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. हे लोक - अमेरिइंडियन - लॅटिन अमेरिकेचे मूळ रहिवासी. कोका त्यांच्या धार्मिक, सांस्कृतिक उपचारांमध्ये वापरला जातो. पारंपारिक औषधात कोकाचा वापर होतो. अँडीज पर्वतराजीत राहणाऱ्या व अमेझॉन नदीच्या बाजूने राहणाऱ्या या समूहांच्या सामाजिक देवाणघेवाणीत कोकाला सांकेतिक महत्त्व आहे. कोकाची पाने चघळणे, त्याचे चहासारखे पेय पिणे हा त्यांच्या संस्कृतीचा भाग आहे. त्याच्या उत्पादनावर त्यांची उपजीविकाही अवलंबून आहे. सोळाव्या शतकाच्या वसाहतवादापासून युरोपियन वंशाच्या लोकांवर त्यांचा आकस आहेच. कारण त्यांच्याच भूमीत त्यांना परके करण्यात आले आहे. आता कोकाची लागवड बंद करा अन्यथा तुरुंगात जावे लागेल, दंड भरावा लागेल. प्रसंगी हिंसा, अत्याचार होतील या धमक्या मिळणे म्हणजे विसाव्या-एकविसाव्या शतकातील नवीन वसाहतवाद आल्यासारखाच आहे. आपली पारंपारिक जीवनपद्धती, अर्थव्यवस्था, लष्करी बळाच्या जोरावर बदलण्याच्या अमेरिकेचा प्रयत्न या असंतोषात भर घालतो.

कोकापासून कोकेन होते. पण या दोन उपयोगांची गल्लत करणे चुकीचे आहे. सांस्कृतिक उपयोग आणि मादक पदार्थ करण्यासाठी उपयोग हे भिन्न आहेत. युरोप आणि अमेरिका ही गल्लत हेतुपुरस्सर करतात कारण त्यायोगे या देशात त्यांना शिरकाव करता येतो. व्यापारी हितसंबंध स्थापता येतात. मुद्दा हा की आर्थिक व वांशिक दुर्बल घटकांवरच उपजीविका, संस्कृती बदलण्याचे दडपण आले. जो कोणी कोकाची लागवड करतो, तो व्यसनाला मदत करतो हा दृष्टीकोन चूक आहे. उदाहरणार्थ पेरूमध्ये चाळीस लाख लोक

कोकाचा व्यसनेतर वापर करतात. बोलिव्हियातील डिसेंबर २००५ मधील निवडणुकांत इवो मोरालेस हा अमेरिइंडियन जमातीचा उमेदवार अध्यक्ष म्हणून निवडून आला. तो स्वत: कोकाची लागवड करत असे. त्याला या प्रश्नाचे स्वरूप आतून माहिती असणे अपेक्षित आहे. राष्ट्रसंघाच्या ६१ च्या जाहीरनाम्यातील नियंत्रित ठेवण्याच्या अंमली पदार्थांच्या यादीतून कोकाची पाने वगळावीत असा विशेषत: बोलिव्हियाचा आग्रह आहे.

**अंत:स्थ हेतू?**

वरील तीन देशांतील कोका पिकवणाऱ्यांची आर्थिक विपन्नावस्था आणि कोकाशी असणाऱ्या भावनिक संलग्नतेचा फायदा घ्यायला गुन्हेगार सरसावले. 'तुम्ही कोका वाढवा, आम्ही तो विकत घेऊ, तुम्हाला संरक्षण देऊ' असे आश्वासन त्यांनी शेतकऱ्यांना दिले. त्यामुळे लागवड चालू राहिली व वाढली. अमेरिकेने पाठिंबा दिलेले त्या-त्या देशाचे लष्कर व पोलिस हे लागवडीच्या विरुद्ध. त्यामुळे गुन्हेगार संघटना आणि शासन यांच्यात चकमकी सुरू झाल्या. वितरण मग संघटित गुन्हेगारांच्या ताब्यात गेले.

१९८० च्या दशकात अमेरिकेत सर्व थरात कोकेनचे व्यसन वाढत होते. तेव्हा कोलंबिया मुख्य वितरक होता. पण कोलंबियाचे अमेरिकेतील वितरण न्यूयॉर्क आणि फ्लोरिडा या अमेरिकेतील राज्यापुरते मर्यादित होते आणि जेथे स्थलांतरित कोलंबियांची अमेरिकेत थोडीफार वस्ती होती, अशा काही शहरांपुरता त्यांचा पल्ला होता. व्यापार वाढवण्यासाठी त्यांना मेक्सिकन्सची मदत उपयोगी पडली. एकतर मेक्सिकन स्थलांतरितांची अमेरिकेतील संख्या प्रचंड आहे. ते देशभर विखुरलेले आहेत. ब्लॅक टार हेरॉईन नावाचा अंमली पदार्थ मेक्सिकोत तयार होतो आणि अमेरिकेत येतो. मेथॅऍम्पिटेमाइन नावाचा दुसरा पदार्थ मेक्सिकन गँग्सच वितरित करतात. या बेकायदेशीर व्यापारातून गोळा होणारा अमाप पैसा परत मेक्सिकोत जातो. एका अंदाजानुसार तेलाच्या निर्यातीतून मिळणाऱ्या परकीय चलनानंतर मेक्सिकोला जास्तीत जास्त परकीय चलन या अंमली पदार्थांच्या व्यापारातून मिळते. त्यामुळे उत्पादक बोलिव्हिया-पेरू-कोलंबिया आणि वितरक मेक्सिको असे चार देश या व्यापारात गुंतलेले आहेत.

अमेरिकन तुरुंग हा एक मोठा उद्योग आहे. अंमली पदार्थांविरुद्धचे युद्ध सुरू झाल्यापासून या उद्योगाला बरकत आली. आज २२ लाख लोक अमेरिकेत तुरुंगात आहेत. अंमली पदार्थांच्या व्यापाराबद्दल ज्यांना अटक होते त्यात प्रामुख्याने हे स्थलांतरित लॅटिन अमेरिकन असतात. अमेरिकन नागरिकांमध्ये तुरुंगात या गुन्ह्याबद्दल जाणाऱ्यात कृष्णवर्णीय आणि गरीब यांची संख्या जास्त असते.

हे युद्ध पुकारण्यामागे अमेरिकेचा खरा हेतू नवीन वसाहती निर्माण करण्याचा असावा असा पुरावा १९८६ सालापासून मिळत आहे. तेव्हा आणि १९९४ साली अमेरिकन सरकारने एक सल्लागार कंपनी नेमली. त्या कंपनीचे काम होते - लॅटिन अमेरिकेत लष्कर पाठवून कोकाची लागवड संपुष्टात आणण्याच्या अमेरिकन धोरणाचे मूल्यमापन करणे. या कंपनीने निष्कर्ष काढला तो असा - लष्कर पाठवून दुसऱ्या देशात युद्ध करून कोकेनचा पुरवठा थांबवण्याचा प्रयत्न फार महागडा आहे. आपल्या देशातील व्यसनाधीनांवर उपचार करून त्यांना व्यसनमुक्त केले तर जो खर्च येईल, त्याच्या तेवीसपट खर्च बाहेर लष्कर पाठवून येतो. हा अहवाल अर्थातच सरकारने फेटाळला आणि धोरण कायम ठेवले. त्याला हा तुरुंग उद्योगही काही अंशी कारणीभूत असावा.

अमेरिका विरुद्ध अंमली पदार्थ हे समीकरण दुसऱ्या अर्थानेही दिसते. अंमली पदार्थांतून मिळणारा पैसा अमेरिकेच्या पाठिंब्याने सत्तेवर आलेल्या आणि सत्तेवर टिकलेल्या लॅटिन अमेरिकेतील अनेक हुकूमशहांनी वापरला आहे. त्यांनीच नव्हे तर सी आय ए या अमेरिकन गुप्तहेर संघटनेनेही वापरल्याची उदाहरणे आहेत. अगदी स्पष्ट पुरावा म्हणजे रोनाल्ड रेगन राष्ट्राध्यक्ष असताना इराण-काँट्रा नावाचे मोठे गौडबंगाल झाले होते. या गुंतागुंतीच्या व्यवहारात अंमली पदार्थांची आयात अमेरिकेत सी आय ए ने केली आणि पैसा मिळवला. तसेच इराणला काही शस्त्रास्त्रे विकून पैसा मिळवला. निकारागुआ या लॅटिन अमेरिकेतील देशातील सँडिनिस्टा या डाव्या चळवळीची विरोधक चळवळ काँट्रा नावाने प्रसिद्ध होती. त्या चळवळीला मदत म्हणून हा पैसा वापरला गेला. इराणशी कोणताही व्यापार करणे अमेरिकेत पूर्णपणे बेकायदेशीर होते. म्हणजे अंमली पदार्थांचा व्यापार आणि इराणशी व्यापार असे दोन गुन्हे सरकारने तेव्हा केले होते.

तरीही सांगायला हे युद्ध अंमली पदार्थांच्या अमेरिकेत होणाऱ्या आयातीविरुद्ध चालू होते आणि आहे. क्षणभर ही भूमिका सच्ची आहे असे गृहीत धरू, तरीसुद्धा, मुळात कोका लागवडीला दुसरा फायदेशीर पर्याय असल्याखेरीज शेतकरी कोकाची लागवड का बंद



*इथे आपल्याला आलिशान महालात उदासपणे बसलेली स्त्री दिसते. नैराश्य ही चैन म्हणून परवडणारा एक वर्ग तयार झाला आहे. हे चित्र त्या वर्गाला उद्देशून आहे.*

करतील हा आर्थिक मुद्दा राहतोच. २००४ साली डिसेंबरमध्ये काळ्या बाजारात कोकाच्या पानांची किंमत दहापटीने वाढली. त्यामुळे जे लागवड करत नव्हते, तेही लागवड करायला लागले. एक हेक्टर कोका वर्षाला साडेसात हजार डॉलर्स उत्पन्न देत असे. एक हेक्टर कोको (पेयासाठी किंवा चॉकलेटमध्ये वापरला जातो तो) एक हजार डॉलर्स देत असे आणि एक हेक्टर कॉफी सहाशे डॉलर्स देत असे. अशा परिस्थितीत गरीबाला नैतिकता, तीही अमेरिकेने शिकवावी हे अजब तर्कशास्त्र होते आणि ते चालणे शक्यही नव्हते. पण ते तर्कशास्त्र पुढे चालवण्यासाठी एक नवी योजना २००० साली अमेरिकेने चालू केली. तिचे नाव 'प्लॅन कोलंबिया'. त्यामध्ये आजवर अब्जावधी डॉलर्स ओतण्यात आले आहेत. या योजनेअन्वये कोलंबियात कोकाची लागवड नष्ट करण्यासाठी लष्कर, पोलीस यांच्या बरोबरीने हेलिकॉप्टरने कोकाच्या पिकांवर विषारी द्रव्यांचा फवारा करण्यात येतो व पीक मारण्यात येते. (पेरूने असा फवारा मारण्यास नकार दिला.) पण या फवाऱ्याने कोकाच नव्हे तर इतर पिकेही नष्ट होतात, अमेझॉन नदीच्या खोऱ्यातील पर्यावरणाची भरून न येणारी हानी होते. इक्वेडोर हा कोलंबियाला लागून असणारा देश. काही फवारे त्यातील पिकांवर ही गेले आणि इक्वेडोरने त्याबाबत कोलंबियाकडे नुकसानभरपाई मागितली आहे. या दग्धभू धोरणाचा परिणाम एवढाच होतो की दुसऱ्या प्रदेशातले शेतकरी कोकाची लागवड करायला लागतात आणि एकूण उत्पादन कायम ठेवतात. प्लॅन कोलंबिया चालू केल्यापासून कोलंबियातील कोकाची लागवड कमी होण्याऐवजी वाढलीच आहे. अमेरिकेच्या अंदाजानुसार २००४ पेक्षा २६% ने ती २००५ मध्ये वाढली तर संयुक्त राष्ट्रसंघाच्या अंदाजानुसार ८% ने वाढली. प्लॅन कोलंबियाच्या सुरुवातीच्या वर्षात - २००० साली जेवढे क्षेत्र लागवडीखाली होते, त्यात २००५ साली ८००० हेक्टर्सची भरच पडली. म्हणजे या योजनेचा इतके पैसे घालून कोकेनच्या नियंत्रणासाठी फायदा झाल्याचे दिसत नाही. अर्थात याचा दोन्ही बाजूंना फायदा होऊ शकतो. 'यश आले नाही, आता तरी प्लॅन बंद करा' म्हणणाऱ्यांना आणि 'अजून यश आले नाही म्हणून प्लॅन चालू ठेवा' म्हणणाऱ्यांना.

*अंमली पदार्थांचा व्यापार बेकायदेशीर आहे. कराराचे पालन झाले नाही, किंवा एका पक्षाला कराराचे पालन झाले नाही असे 'वाटले' तर गोळ्या घालून प्रश्न सोडवला जातो. म्हणजे हिंसा न्यायदानही करते आणि शिक्षाही असते.*

एवढी वाढ असेल, तर आणखी लष्कर पाठवा आणि शेतकऱ्यांना तुरुंगात टाका असे धोरण अधिकृत/अनधिकृतरीत्या राबवले जाऊ शकते.

दरम्यान अमेरिकन खासदारांच्या एका समितीने या योजनेचा आढावा घेतला. कोलंबियाच्या अध्यक्षपदी यावर्षी पुन्हा निवड झाल्यावर उरिबेने अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बुश यांची भेट घेतली. त्या भेटीत त्याने प्लॅन कोलंबिया पुढे नेण्यासाठी जास्तीची हेलिकॉप्टर्स आणि इतर यंत्रसामुग्री मागितली.

त्यांनी त्यावर पुढील टिप्पणी केली आहे. ''प्लॅन कोलंबियावर अधिक खर्च करण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या पर्यायी विकासासाठी खर्च करणे उचित ठरेल. त्याखेरीज ग्रामीण कोलंबियात शांतता आणि सुबत्ता येणार नाही.''

अमेरिकेच्या आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वेक्षणानुसार असे आढळून आले आहे की हेलिकॉप्टरने पिके बेचिराख करण्याचे धोरण फसले आहे. एव्हाना अगदी कमी क्षेत्रात कोकाची लागवड शिल्लक राहायला पाहिजे होती आणि पर्यायाने अमेरिकेतील कोकेनचा भाव अनेक पटींनी वाढायला हवा होता. या दोन्ही गोष्टी झालेल्या नाहीत.

२००५ साली तर जास्तीत जास्त क्षेत्रावर हेलिकॉप्टरने फवारा करण्यात आला होता. २००० ते २००५ या सहा वर्षांत साडेसहा लाख हेक्टर्सहून अधिक क्षेत्रावर फवारा करण्यात आला आणि अब्जावधी डॉलर्स खर्च झाले. (हा पैसा करदात्या अमेरिकनांचा आहे.) पण तरीही कोका उत्पादन या काळात सहा टक्क्यांनी वाढले.

याचा अर्थ असा की दारिद्र्यरेषेखाली राहणाऱ्या ८५% टक्के कोलंबियन जनतेला जर दारिद्र्यरेषेच्या वर आणायचे असेल, तर टिकाऊ विकासयोजनांकडे पैसा वळवणे आवश्यक आहे. सध्याच्या अमेरिकन मदतीचा ८०% भाग कोकाची लागवड नष्ट करण्यासाठी लागणाऱ्या लष्करी/पोलिस दलात आणि हेलिकॉप्टरने फवारे मारण्यात जातो. फक्त २०% भाग विकासासाठी लागणारी आर्थिक मदत आणि कायद्याचे राज्य प्रस्थापित करण्याकडे जातो. या धोरणाचा पुनर्विचार करण्याची जरुरी आहे.

बोलिव्हियाचे सध्याचे धोरण त्यामानाने तडजोडीचे दिसते. 'कोका - हो, कोकेन - नाही' हे ते धोरण. कोकाची खासगी उपयोगासाठी लागवड मर्यादित क्षेत्रात करण्याची मुभा या धोरणान्वये शेतकऱ्यांना दिली आहे. त्याउपरची लागवड शेतकऱ्यांनी स्वयंखुषीने बंद करायची. ही सहकार्यावर आधारित योजना कितपत यशस्वी होते ते पहायचे. मोरालेस हा नवा अध्यक्ष, आधी म्हटल्याप्रमाणे कोका वाढवणाऱ्या जमातीतून आला आहे. त्याची अमेरिकेचा शत्रू वेनेझुएलाचा अध्यक्ष शावेझ याच्याशी दोस्ती आहे. त्यामुळे अमेरिकेची प्रतिक्रिया काय राहते तेही लक्षणीय ठरेल. कारण कोकाची लागवड कमी करणे हे जर केवळ निमित्तच असेल आणि मूळ उद्देश वसाहतवाद असेल तर अगदी लागवडी कमी झाल्या तरी हस्तक्षेपासाठी अमेरिका निराळे कारण पुढे करणारच.

**वसाहतवाद व कार्टेल्स**

अंमली पदार्थांवर नियंत्रण हे अमेरिकेचे महत्त्वाचे अंतर्गत धोरण असते, लोकशाहीचा प्रसार हे परराष्ट्रीय धोरण आहे. जेव्हा या दोन

धोरणांमध्ये निवडीचा प्रश्न येतो, तेव्हा अमेरिका अंमली पदार्थांच्या नियंत्रणाला जास्त महत्त्व देते.

कोलंबियातही त्यांच्या राष्ट्राध्यक्षानेच (अर्नेस्टो सँपर) ६० लाख डॉलर्सची लाच 'काली कार्टेल' या अंमली पदार्थांचा व्यापार करणाऱ्या गुन्हेगारी संघटनेकडून घेतल्याचे उघड झाले होते. मग अमेरिकेने कोलंबियावर मर्यादित आंतरराष्ट्रीय बहिष्कार टाकला. त्यामुळे अमेरिका अंमली पदार्थाबाबत कडक धोरण स्वीकारते हे जाहीर झाले, पण या बहिष्काराचा परिणाम कोलंबियाच्या व्यापारावर, आयात-निर्यातीवर आणि पर्यायाने लोकशाही खिळखिळी होण्यात झाला.

आताही कोलंबियात फवाऱ्यांमुळे लहान शेतकऱ्यांची उपजीविकाच संपुष्टात आली आहे. मग ते सरकारविरोधी हिंसक चळवळी करणाऱ्यांना पाठिंबा देतात. त्यात शेतकऱ्यांना सामोरे येतात ते लष्कर किंवा पोलिस. नागरी सरकारी अधिकारी किंवा राजकीय कार्यकर्त्यांनी जर ही लागवड कमी करण्यासाठी शेतकऱ्यांशी संपर्क साधला, तर परिणाम निराळा होऊ शकतो. संघर्ष कमी होऊ शकतो. तसे न केल्यास लोकशाही धोक्यात येते.

शिवाय, या धोरणाचा स्थानिक हुकूमशहांना उपयोग होतो. कोकानियंत्रणाच्या नावाखाली त्यांना आधुनिक शस्त्रास्त्रे, प्रशिक्षित सेनादल अमेरिकेकडून मिळते. त्याचा वापर विरोधकांची गळचेपी करण्यासाठी ते आजवर करत आले आहेत. म्हणून लागवड चालू राहणे त्यांच्या फायद्याचेही आहे.

एकूण सद्यस्थितीत सामाजिक अशांतता आणि कोकाची लागवड याबाबत फारसा आशावाद बाळगता येणार नाही.

**अमली दहशतवाद**

आता या व्यापाराने हिंसा कशी वाढते ते मेक्सिकोच्या उदाहरणाने पाहू. अमेरिकेत येणाऱ्या अंमली पदार्थांतील ७० ते ९०% अंमली पदार्थ मेक्सिकोमार्गे येतात. त्यांचे उत्पादन लॅटिन अमेरिकेत इतरत्र होत असले, तरी वाहतूक व वितरण मेक्सिकोतर्फे होते.

गेल्या दशकात मेक्सिकोतील सामाजिक जीवन या व्यापारामुळे ढवळून निघाले आहे. विशेषत: अमेरिकेच्या सीमेवरच्या मेक्सिकोतील शहरांमध्ये संघटित गुन्हेगारी वाढली आहे.

२००५ पासून अंमली पदार्थांच्या व्यापाराशी संलग्न २००० हून अधिक खून मेक्सिकोत झाले. जानेवारी-जून २००६ या सहा महिन्यात ८६० खून झाले. मेक्सिकोभर हे हिंसेचे सत्र चालू आहे. तिजुआना या अगदी पश्चिमेच्या शहरात २००५ मध्ये ४०० खून झाले. चुलिआचान, अचापुल्चो या दक्षिणेतील शहरात च्विदाद जुआरेस या उत्तरेकडच्या शहरात शेकड्याने माणसे ठार मारली जातात. शहरांमध्ये दिवसाढवळ्या गोळीबार होतात, माणसांना पळवले जाते, ओलिस ठेवून पैशाची मागणी केली जाते किंवा या व्यापाराला 'अडचणीची' असणारी माणसे 'अदृश्य' होतात.

नूके लारेदो हे उत्तरेकडील शहर अमेरिकेतील लारेदो शहराच्या जवळ आहे. मेक्सिकोतून अमेरिकेला होणाऱ्या कायदेशीर निर्यातीतील ४० टक्के निर्यात या शहरातून होते. रोज ६००० ट्रक्स वेगवेगळा माल घेऊन नूवो लारेदोहून लारेदोकडे रवाना होतात, तेथून डल्लास या अमेरिकेतील शहरात जातात आणि मग अमेरिकाभर पसरतात. या कायदेशीर वाहतुकीबरोबरच अंमली पदार्थांची बेकायदेशीर वाहतूक करण्यासाठीही या शहराला महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे हे शहर संघटित गुन्हेगारीचे केंद्र आहे. या शहरावर ताबा मिळवण्यासाठी गुन्हेगारी टोळ्या पोलिसांविरुद्ध, लष्कराविरुद्ध आणि एकमेकांविरुद्ध सतत लढत असतात.

मेक्सिकोत चार-पाच प्रमुख टोळ्या हा व्यापार हाताळतात. त्यांना इंग्रजीत 'कार्टेल' म्हणतात. वेगवेगळ्या शहरात वेगवेगळ्या कार्टेल्स्‌चा प्रामुख्याने प्रभाव असतो पण नूवो लारेदो सगळ्यांच्याच दृष्टीने महत्त्वाचे आहे.

नूवो लारेदोची लोकसंख्या साडेतीन लाख. या शहरात कोकेनशी निगडित ६८ खून २००४ साली झाले. २००५ ला १८० खून झाले आणि २००६ च्या पहिल्या सहा महिन्यात ११४ खून झाले. (या सहा महिन्यात २००५ मध्ये ४५ खून झाले होते.) म्हणजे खुनांचे प्रमाण वाढत आहे. बहुतांशी खुनांची प्रकरणे दाबली जातात. त्यांचा काहीच तपास लागत नाही. कारण त्यात अनेक हितसंबंध गुंतलेले असतात.

या हिंसाचाराची अनेक कारणे आहेत. सगळ्यात महत्त्वाचे कारण म्हणजे अंमली पदार्थांचा व्यापार बेकायदेशीर आहे. सगळाच व्यापार दिलेल्या शब्दावर चालतो. त्याची कोठेच लेखी नोंद नसते. कायदेशीर व्यापारात एखाद्याने कराराचा भंग केला, काही गुन्हा केला, तर कोर्टात जाणे, पोलिसांकडे तक्रार नोंदवणे वगैरे सामोपचाराचे मार्ग उपलब्ध असतात. हिंसेने प्रश्नाचे उत्तर शोधण्याची वेळ येत नाही. बेकायदेशीर व्यापारात हा मार्ग उपलब्ध नसतो. कराराचे पालन झाले नाही, किंवा एका पक्षाला कराराचे पालन झाले नाही असे 'वाटले', तर गोळ्या घालून प्रश्न सोडवला जातो. (हे 'वाटण्याचे' प्रमाण या व्यवहारात जास्त असते कारण सगळाच मामला तोंडी असतो.) म्हणजे हिंसा न्यायदानही करते आणि शिक्षाही असते.

तसेच जास्तीत जास्त फायदा होण्यासाठी आपल्या संघटनेचे आणखी मोठ्या क्षेत्रावर प्रभुत्व स्थापित करण्याची जरूरी असते. यासाठी दोन पर्याय असतात. एक म्हणजे दुसऱ्या टोळीशी बातचीत करून आपापल्या प्रभुत्वाखालचे क्षेत्र ठरवून कमी फायद्यात दोघांनी समाधान मानणे. दुसरा पर्याय म्हणजे हिंसेने स्पर्धाच नष्ट करणे. सत्तेच्या अभिलाषेने कार्टेल्स दुसरा पर्याय स्वीकारतात आणि हिंसा वाढते.

एखाद्या खालच्या पातळीवरच्या गुंडाला टोळीमध्ये 'वर' सरकायचे असेल, 'प्रमोशन' हवे असेल, तर तो किती खून करतो यावर त्याची समर्थता ठरते.

हिंसाचार आणखी एका कारणाने वाढतो. ते कारण म्हणजे वैयक्तिक दुष्मनी. प्रतिस्पर्धी टोळीने एखाद्याचा भाऊ ठार मारला,

कुटुंबावर हल्ला केला, तर प्रत्युत्तर म्हणून आणखी हिंसा वाढते. एकदा हे वैयक्तिक खुनांचे सत्र सुरू झाले की ते हां हां म्हणता वेग घेते आणि बळींची संख्या वाढते.

प्रत्येकवेळी अंमली पदार्थांचे नियंत्रण करण्यासाठी या टोळ्या नेस्तनाबूत करणे हे धोरण हिंसा कमी करण्यासाठी उपयोगी पडतेच असे नाही. कारण अशा पराभूत टोळीकडे असणारा व्यापार, असणारे गुंड आपल्याकडे आणण्याची संधी प्रतिस्पर्धी टोळीला मिळते. या व्यापारावर ताबा मिळवण्यासाठी परत हिंसाचार वाढतो.

**दहशतीखाली माध्यमे**

अशा परिस्थितीत स्वतंत्र प्रसारमाध्यमे महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. पण माध्यमेही गुंडांच्या दहशतीखाली आहेत. कार्टेलकडून पैसे मिळणारे वार्ताहरही आहेत. गेल्या दोन वर्षांत नूवो लारेदोन एका प्रमुख दैनिकाच्या संपादकाचा आणि रेडिओच्या दोन वार्ताहारांचा खून झाला. त्यातील एक वार्ताहार एका टोळीकडून पैसे खात असल्याचा संशय आहे.

या परिस्थितीत निष्पक्षपाती बातम्या द्यायला वार्ताहर धजावत नाहीत. बातम्या त्रोटक आणि वरवरच्या दिल्या जातात. धमक्या आणि लाच याचा वापर करून कार्टेल्स आपल्याला हव्या तशा बातम्या प्रसिद्ध होतील याची खबरदारी घेतात.

याचा परिणाम म्हणजे प्रसारमाध्यमांची विश्वासार्हता कमी होते. मग लोक अफवांवर जास्त विश्वास ठेवतात आणि घबराटीत भर पडते. चुकीच्या वेळी चुकीच्या ठिकाणी असल्याने अनेक सामान्य निरपराधी भरडले जातात. पावसाने झोडपले न् राजाने मारले तर सांगणार कोणाला या कचाट्यात सापडतात.

अलिकडे वाढलेल्या या हिंसेचा मेक्सिकन आणि अमेरिकन सरकार निराळाच अर्थ लावते. त्यांच्या मते वाढलेली हिंसा ही अंमली पदार्थांविरुद्धची मोहीम यशस्वी होत असल्याचे लक्षण आहे. गुंड अधिकाधिक हताश होत आहेत आणि सरकार, पोलिस यांच्याविरुद्धचे हे हल्ले या हताशपणाहून आलेले आहेत.

पण अमेरिकेत येणाऱ्या अंमली पदार्थांच्या एकूण आयातीत घट झाल्याचे दिसत नाही, हिंसेत वाढ मात्र नक्की आहे. हिंसेतील वाढ म्हणजे मोहिमेची यशस्विता हे समीकरणही धोक्याचे आहे. एकतर त्यामागे असे गृहीत आहे, की सगळेच बळी अंमली पदार्थांचे तस्कर किंवा गुंड आहेत आणि हा व्यापार कमी व्हायला त्यांच्या मृत्यूची मदत होईल. दुसरे म्हणजे ही हिंसा देशाच्या न्यायव्यवस्थेच्या बाहेर आहे, ती बेकायदेशीर आहे - याकडे अशा समीकरणांमुळे दुर्लक्ष होते. कायद्याने गुन्हा सिद्ध झाल्याखेरीज प्रत्येक संशयित निरपराध असतो हे कायद्याचे मूळ तत्त्वच नाकारले जाते. 'टार्गेट' साधणे हा पोलिसी कारवाईचा भाग होतो. आपल्याकडे जसा नक्षलवादी चळवळीविरुद्ध 'कितीजणांना अटक केली/किती जणांवर खटले भरले' या टार्गेटला महत्त्व प्राप्त होते, तोच प्रकार. मग निरपराध त्यात अडकले किंवा नाही याची फिकीर नसते. या मानसिकतेमुळे गुन्ह्यांचा तपास नीट होत नाही. खून झाला की तो अंमली पदार्थांच्या व्यापाराच्या संदर्भातच असणार असे म्हणून पोलीस आपली जबाबदारी झटकतात.

मेक्सिकोतील हिंसेचे आणखी एक प्रमुख कारण म्हणजे अमेरिकेत बंदुका सहज उपलब्ध होतात. लिलावांमध्ये, इंटरनेटवर, जत्रांमध्ये मोठ्या प्रमाणावर बंदुका विकल्या जातात. बंदुका कोण विकत घेतो आहे याची छाननी होत नाही. बेनामी व्यवहारात अमेरिकेतील सामान्य नागरिकांनाही जास्त पैसे देऊन बंदुका विकत घ्यायला भाग पाडले जाते आणि या बंदुका मेक्सिकोत येतात.

लेखाच्या आधीच्या भागात म्हटल्याप्रमाणे हा अमेरिकेचा अंतर्गत प्रश्न आहे मात्र तो अमेरिकेतच सोडवण्याचा प्रयत्न दिसत नाही. म्हणजे, तेथील व्यसनाधीनांवर तेथेच उपचार करून त्यांना व्यसनमुक्तीच्या दिशेने नेणे स्वस्त आहे आणि ते दूरदृष्टीचेही ठरेल.

अठरा वर्षांच्या आतील व्यसनाधीनांची संख्या ९९ सालापासून वाढते आहे एवढेच नव्हे तर १२ व्या वर्षापासूनचे कोकेनवर अवलंबून असणारे व्यसनीही हळुहळू वाढत आहेत.

१२ व्या वर्षापासून या व्यसनाला सुरुवात होते. त्यातही २००३ ला ही संख्या चार लाखाच्या आसपास होती व ती सतत वाढतच आहे. अमेरिकेतील ज्या व्यसनाधीनांना व्यसनमुक्त होण्यासाठी मदत हवी आहे पण मदत मिळत नाही अशांची संख्याही प्रचंड आहे. दुसऱ्या एका अंदाजानुसार ८१ लाख अमेरिकनांना अंमली पदार्थ वापराबद्दल उपचारांची जरूरी होती त्यातील फक्त १४ लाख लोकांना उपचार मिळाले.

थोडक्यात ८१ लाख अमेरिकनांना व्यसनमुक्त करणे हा आर्थिकदृष्ट्या स्वस्त, सामाजिकदृष्ट्या फायदेशीर पर्याय आहे. त्यासाठी इतर देशात हस्तक्षेप करायचीही जरूरी नाही. एका अभ्यासानुसार उपचारांवर खर्च केलेला प्रत्येक डॉलर पुढचे सात डॉलर्स वाचवतो. पुढची पोलीस कारवाई, तुरुंगवास वगैरे गोष्टींवर हे सात डॉलर्स खर्च होतात.

पण 'आमचा प्रश्न तुम्ही निर्माण केला आहे' ही साम्राज्यवादी वृत्ती हा अमेरिकेत देशांतर्गत उत्तर शोधण्याच्या मार्गात अडसर आहे. 'तुम्ही कोकेन पुरवता म्हणून आमचे लोक व्यसनाधीन होतात' हे प्रश्नाचे उत्तर नाही तर हस्तक्षेप करण्याची सबब आहे.

तात्पर्य, हा गुंता नजीकच्या भविष्यात सुटणे कठीण दिसते.

*(माझे मित्र श्री. संजीव देव व श्री. मनोज खटावकर यांनी इंटरनेट सुविधा मला उपलब्ध करून दिल्यामुळे हा लेख अल्पावधीत लिहिणे शक्य झाले.)*

**चन्द्रशेखर पुरन्दरे**
*वेबसाईट : www.art-non-deco.com*
*ई-मेल : artnondeco@yahoo.co.uk*